# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

**<u>प्रेस नोट</u>** दि.२२/११/२०२३

## एम.आय.डी.सी भोसरी पोलीसांनी सराईत गुन्हेगाराकडुन एक गावठी बनावटीचे पिस्टल व एक जिवंत राऊंड हस्तगत करुन त्यास अटक केले

---

दिनांक २०/११/२०२३ रोजी एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार खाजगी वाहनाने पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पोलीस हवालदार गवारी बं.नं. ५०६ यांना गुप्त बातमीदार मार्फत बातमी मिळाली की,यशवंतनगर चौक,से.नं.७,एम.आय.डी.सी. भोसरी,पुणे येथे एक इसम हा कंबंरेला पिस्टल लावुन थांबला आहे.त्याचे अंगात काळे रंगाचा शर्ट व निळया रंगाची पॅन्ट आहे.अशी बातमी मिळाल्याने त्यांनी सदरची बातमी मा.राजेंद्र निकाळजे सो.वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना कळविले असता त्यांनी सदर ठिकाणी छापा घालुन कारवाई करण्याचे आदेश दिल्याने तपास पथकातील अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सचिन चव्हाण व अंमलदार बातमी मिळाले ठिकाणी यशवंतनगर चौक,से.नं. ७,एम.आय.डी.सी. भोसरी, पुणे येथे जावुन दुपारी १४/१५ वा छापा घातला असता सदर ठिकाणी वरील वर्णनाचे कपडे घातलेला इसम मिळुन आल्याने त्यास पकडुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव सुरज प्रदिप शिंदे वय २४ रा. खोली नं १६ राजवाडा इंद्रायणी नगर भोसरी पुणे असे सांगीतले. त्याची पंचाचे समक्ष अंगझडती घेतली असता त्याचे कंबरेला लावलेला एक गावठी बनावटीचे पिस्टल व एक जिवंत राउंड मिळुन आले त्यांचे वर्णन खालील प्रमाणे-

१) २५,०००-०० /- रुपये किंमतीचे एक गावठी बनावटीचे लोखंडी पिस्टल मॅगझीन असलेली तीचे मुठेस दोन्ही बाजुने फायबरचे स्क्रुने लावलेली तपकिरी रंगाची पट्टी त्यावर दोन्ही बाजुस निळया रंगात पंचकोनी स्टार असलेली

२) ३००-०० /- रुपये किंमतीचा एक जिवंत पिस्टलचा राऊंड त्याचे मागील बाजुस इंग्रजीमध्ये के.एफ. असे व ७.६५ लिहले असलेले

-----------------------

२५,३००-००/-रुपये एकुण किंमतीचे येणे प्रमाणे वरील वर्णनाचा मुद्देमाल मिळुन आल्याने तो पंचाचे समक्ष गुन्हयाचे पुढील तपास कामी सचिन चव्हाण पोलीस उपनिरीक्षक,यांनी ताब्यात घेवुन आरोपी विरुध्द एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशन.गु.रजि.नं.५८८/२०२३,भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५) महाराष्ट्र पोलीस अधि.कलम ३७ (१),(३) सह १३५,प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर आरोपीस मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी सो. पिंपरी कोर्ट,पुणे. यांचे कोर्टात हजर केले असता

त्यास मा. न्यायालयाने दि. २३/११/२०२३ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे. सदरचा आरोपी हा रेकॉर्डवरील असुन त्याचेवर खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) एमआयडीसी भोसरी पो.स्टे. गु.र.नं. १४२/१७ भादवि ३३२, ३५३,३२३, ५०४,५०६(१),३४
२) एमआयडीसी भोसरी पो.स्टे. गु.र.नं. ३४/१८ भादवि ४५२,५०६(२),५०४,३४ भा.ह.का.कलम ४(२५),म.पो.अधि. ३७(१)१३५
३) एमआयडीसी भोसरी पो.स्टे. गु.र.नं. ४२६/२१ भां.दं.वि. क.३५४(अ)(ड)
४) एमआयडीसी भोसरी पो.स्टे. गु.र.नं. २९६/२३ भा.ह.का.कलम ४(२५),म.पो.अधि. ३७(१)१३५

सदरची कारवाई ही **मा.पोलीस आयुक्त सो. श्री विनयकुमार चौबे, मा.सह पोलीस आयुक्त सो. डॉ.संजय शिंदे, मा.अप्पर पोलीस आयुक्त सो. वसंत परदेशी, मा.पोलीस उपायुक्त सो. संदिप डोईफोडे परि-०३, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त सो. श्री.विवेक मुगळीकर, MIDC भोसरी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो. श्री.राजेंद्र निकाळजे, यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक सचिन चव्हाण,पोलीस अंमलदार चंद्रकांत गवारी, शरद गांधिले, संजय जरे, स्वप्निल शेलार,गणेश बो-हाडे. अमोल दातार,प्रविण मुळुक, नितिन खेसे, भागवत शेप, विशाल काळे,अक्षय क्षिरसागर** यांनी केली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशनचे **पोलीस उपनिरीक्षक अशोक तरंगे** हे करीत आहेत.

**(संदिप डोईफोडे)**
**पोलीस उप आयुक्त**
**परिमंडळ-३, पिंपरी चिंचवड**